आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२ डिसेंबर २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- मतदार याद्यांचं पुनरिक्षण आणि इतर मुद्द्यांवरुन गदारोळ झाल्यामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दोन वाजेपर्यंत स्थगित.

- महत्त्वाच्या मुद्द्यांवर तातडीनं चर्चा घेण्याची विरोधकांची भूमिका, तर सरकार चर्चेला तयार असूनही विरोधक संसदेच्या कामकाजात अडथळा आणत असल्याची केंद्रीय संसदीय कार्य मंत्र्यांची टीका

- महाराष्ट्रात २२२ नगरपंचायत आणि नगरपरिषद निवडणुकांची मतमोजणी लांबणीवर / आज मतदान शांततेत सुरु

**आणि**

- भारताबरोबरचा व्यापार २०३० पर्यंत १०० अब्ज डॉलर्स पर्यंत नेण्याचं रशियाचं उद्दीष्ट

**<><><><><>**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशी मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षण या मुद्द्यावर चर्चा करण्याची मागणी करत विरोधी पक्षाच्या सदस्यांनी दोन्ही सभागृहात घोषणाबाजी केली. त्यामुळे दोन्ही सभागृहांचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

सखोल पुनरीक्षणावर तातडीने चर्चा सुरू करण्याची मागणी विरोधी पक्षांनी लावून धरली. लोकशाही आणि नागरिकांच्या हितासाठी ही चर्चा होणं गरजेचं आहे, असं राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे म्हणाले.

तर विरोधकांच्या घोषणाबाजीवर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी नाराजी व्यक्त केली. सरकार सर्व विषयांवर चर्चा घडवून आणण्यासाठी तयार आहे. मात्र सगळ्या चर्चा आत्ताच व्हाव्यात हा विरोधकांचा अट्टाहास योग्य नाही, नवे नवे मुद्दे शोधून संसदेच्या कामकाजात अडथळा आणणं बरोबर नाही असं रिजिजू संसद भवन परिसरात वार्ताहरांशी बोलताना म्हणाले.

- **- होल्ड बाईट किरेन रिजीजू - -**

सकाळी अकरा वाजता लोकसभेचं कामकाज सुरू झालं तेव्हा सभापती ओम बिर्ला यांनी जॉर्जियाच्या संसदीय शिष्टमंडळाचं स्वागत केलं. या भेटीमुळे भारत आणि जॉर्जिया यांच्यातले द्विपक्षीय संबंध अधिक दृढ होतील असं सभापती बिर्ला म्हणाले.

सभापतींनी प्रश्नोत्तराचा तास पुकारल्यानंतर विरोधी पक्ष सदस्यांनी मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणासह इतर मागण्यांवर चर्चा करण्याची मागणी करत घोषणाबाजी सुरू केली. या गदारोळातच मंत्र्यांनी सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरं दिली. त्यानंतर विरोधी पक्ष सदस्यांनी हौद्यात उतरून घोषणाबाजी करायला सुरुवात केली. सभापतींनी सर्व सदस्यांना शांततेचं आवाहन केलं, मात्र त्यानंतरही गदारोळ सुरूच राहिल्याने सभापतींनी सभागृहाचं कामकाज दुपारी बारा वाजेपर्यंत तहकूब केलं.

त्यानंतर सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यावर प्रश्नोत्तराचा तास पुन्हा सुरू झाला. विकसित भारताचं उद्दिष्ट गाठण्यासाठी सर्व राज्यांमधल्या सर्व क्षेत्रात विकास व्हायला हवा असं मत्सव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंह एका प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले. प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेमुळे मत्स्यव्यवसायात मोठं परिवर्तन घडल्याचं त्यांनी सांगितलं.

ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी सरकारनं सहकार क्षेत्रात अनेक परिवर्तनकारी पावलं उचलली, असं केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. देशातल्या सहकारी संस्थांना बळ देण्यासाठी सरकारने सहकार मंत्रालयाची स्थापना केली, असंही ते म्हणाले.

त्यानंतर पुन्हा एकदा विरोधकांनी सखोल पुनरीक्षणावर चर्चा घडवून आणण्याची मागणी करत घोषणाबाजी सुरू केली. त्यामुळे सभागृहाचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**राज्यसभेत** आज सकाळी कामकाज सुरू झाल्यावर शून्य प्रहर पुकारण्यात आला. त्यानंतर लगेच मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणाविषयी चर्चा करण्याची मागणी करत विरोधकांनी घोषणाबाजी सुरू केली. यामुळे राज्यसभेचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

देशात करनिर्धारणातली पारदर्शकता प्रशासकीय सुधारणांच्याही पुढे राहिलेली आहे. असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज नवी दिल्लीत १८ व्या ग्लोबल फोरममध्ये बोलत होत्या. करनिर्धारण सुटसुटीत आणि पारदर्शक असल्यामुळे स्वेच्छेने करभरणा करण्याला प्रोत्साहन मिळतं, असं त्या म्हणाल्या. करबुडवेपणामुळे केवळ महसुलातच तूट येते आणि त्यामुळे विकासावरही प्रतिकूल परिणाम होतो असंही त्यानी सांगितलं.

**... होल्ड – बाईट- सीतारामन**

**<><><><><>**

देशातल्या वस्तू आणि सेवा कर संकलनामध्ये, गेल्या वर्षीच्या नोव्हेंबरच्या तुलनेत ७ दशांश टक्के वाढ झाली असून, सुमारे १ लाख ७० हजार कोटी रुपये कर संकलन झालं आहे. गेल्या वर्षी, नोव्हेंबरमधे जीएसटी संकलन १ लाख ६९ हजार कोटी रुपये होतं.

**<><><><><>**

राज्यातल्या नगरपंचायत आणि नगरपरिषदांच्या निवडणुकीची उद्या होणारी मतमोजणी उच्च न्यायालयानं पुढे ढकलली आहे. ही मतमोजणी आता २१ डिसेंबरला करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानं आज दिले. या निवडणुका निष्पक्ष तसेच पारदर्शक व्हाव्यात यादृष्टीनं खंडपीठानं हा निर्णय दिल्याची माहिती वकीलांनी दिली असून निवडणुका होत असलेल्या भागातली आचारसंहिताही २० डिसेंबर पर्यंत कायम राहणार आहे.

दरम्यान राज्यातल्या २२२ नगरपंचायती आणि नगरपरिषदांसाठी आज शांततेत मतदान सुरु आहे. सकाळी साडे अकरा वाजेपर्यंत १७ पूर्णांक ११ शतांश टक्के मतदान झालं आहे.

**<><><><><>**

या निर्णयाबाबत महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक अधिनियमातल्या तरतुदींचा अन्वयार्थ चुकीचा काढण्यात आल्याची प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. ते आज मुंबईत माध्यमांशी बोलत होते. न्यायालयाने दिलेला निकाल सर्वांना मान्य करावा लागेल. मात्र, घोषित झालेल्या निवडणुका आणि निकाल पुढे ढकलण्यात आल्याचं प्रथमच

घडत आहे. निवडणूक आयोगाला आणखी निवडणुका घ्यायच्या आहेत, त्यामुळे या सर्व प्रक्रियेत सुधारणा व्हावी अशी अपेक्षा फडणवीस यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

भारतात तयार होणाऱ्या तसेच आयात केल्या जाणाऱ्या सर्व मोबाईल फोन्सच्या हँडसेटमध्ये संचार साथी हे ॲप आधीपासूनच जोडण्याचे निर्देश केंद्र सरकारनं दिले आहेत. मोबाईल हँडसेटची सुरक्षितता आणि खरेदीतील फसवणूक टाळण्याच्या दृष्टीने हे ॲप महत्त्वाचं आहे. त्यामुळे बनावट हँडसेट खरेदी तसंच मोबाईल फोनचा गैरवापराची तक्रार करणं सोपे होणार आहे. फोनमधलं हे अँप वापरकर्त्यांना पहिल्यांदा फोन सुरू करताना सहजपणे दिसावं आणि सुलभतेने वापरता यावं, तसेच अँपचे कार्य प्रतिबंधित अथवा मर्यादित नसावीत याची काळजी घ्यावी असं केंद्र सरकारने सांगितलं आहे.

**<><><><><>**

भारताबरोबरचा व्यापार २०३० पर्यंत १०० अब्ज डॉलर्स पर्यंत नेण्याचं रशियाचं उद्दीष्ट आहे, असं रशियाचे पहिले उपप्रधानमंत्री डेनिस मंटुरोव्ह यांनी एका मुलाखतीत सांगितलं. हे उद्दिष्ट महत्त्वाकांक्षी असून ते साध्य करण्यासाठी दोन्ही देशांच्या सरकारांनी तसंच उद्योग क्षेत्र आणि वित्तीय संस्थांनी एकत्रित प्रयत्न करणं आवश्यक आहे, असंही ते म्हणाले. दोन्ही देशांदरम्यान मुक्त व्यापार करारासंबंधात चर्चा सुरू आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारताचे अमेरिकेतील राजदूत विनय क्वात्रा यांनी अमेरिकेतल्या महत्त्वाच्या सिनेटर्सशी ऊर्जा, संरक्षण आणि व्यापार या क्षेत्रात द्विपक्षीय संबंध मजबूत करण्याविषयी चर्चा केली. राजदुतांच्या वॉशिंग्टनमधल्या निवासस्थानी सिनेटर लिंडसे ग्राहम, रिचर्ड ब्लुमेंतल, शेल्डन व्हाईटहाऊस, पीटर वेल्च, डॅन सुल्लीवन आणि मार्कवेयन मुलीन यांनी या चर्चेत भाग घेतला. भारत आणि अमेरिका यांच्यातील द्विपक्षीय संबंध दृढ करण्यासाठी सहकार्य करण्याबद्दल क्वात्रा यानी सर्व सिनेटर्सचे आभार मानले.

**<><><><><>**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त, मध्य रेल्वे १२ विशेष उपनगरी रेल्वे गाड्या चालवणार आहे. बाबासाहेबांना आदरांजली वाहण्यासाठी येणाऱ्या

अनुयायांच्या सोयीसाठी, येत्या शुक्रवारच्या मध्यरात्री  परळ ते कल्याण आणि कुर्ला ते पनवेल या स्थानकांदरम्यान या गाड्या धावणार असून त्या प्रत्येक स्थानकावर थांबतील, अशी माहिती रेल्वे विभागानं दिली आहे.

**//<><><><><>//**